RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १६४(२)] मंगळवार, डिसेंबर १८, २०१८/अग्रहायण २७, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ डिसेंबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन.२०१८/प्र.क्र.९०/ज-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक जमीन. २०१८/प्र.क्र.९०/ज-१, दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ व्दारा " महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करणे) नियम, २०१८ " या नियमांचा मसुदा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८, आणि कलम २९ अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, त्या नियमांचा मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आला आहे आणि त्याव्दारे अशी नोटीस दिली आहे की, उक्त मसुदा दिनांक १८ डिसेंबर २०१८ किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल ;

आणि ज्याअर्थी, त्या अधिसूचनेमध्ये असे देखील नमूद केले आहे की, या मसुद्याच्या संबंधात कोणत्याही हरकती व सूचना महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे कोणत्याही व्यक्तींकडून वरील दिनांकास अथवा त्यापूर्वी प्राप्त होतील, त्या हरकती व सूचना उक्त मसुद्याच्या संबंधात शासनाकडून विचारात घेण्यात येतील ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे असे मत झाले आहे की, सदर मुदत ही दिनांक १ जानेवारी २०१९ पर्यंत वाढविणे अत्यावश्यक आहे ;

त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८, आणि कलम २९ अ आणि महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या (१९०४ महा.१) कलम २१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याव्दारे सदर अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

सदर अधिसूचनेमध्ये ज्या ठिकाणी अंकात अथवा शब्दात " दिनांक १८ डिसेंबर २०१८ " असा उल्लेख आलेला आहे, त्याऐवजी अंकात अथवा शब्दात " दिनांक ०१ जानेवारी, २०१९ " असा उल्लेख दाखल करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mumbai 400 032, dated the 18th December 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA GENERAL CLAUSES ACT. MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin. 2018/C.R.90/J-1.—Whereas, the Government of Maharashtra, *vide* Government Notification, Revenue and Forests Department, No. Jamin. 2018/C.R. 90/J-1, dated the 17th November 2018, published the draft of Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy, Class-II and Leasehold lands into Occupancy, Class-I lands) Rules, 2018 proposed to be made in exercise of the powers conferred by section 29-A and 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code for information of all the persons likely to be affected thereby, and notice was thereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 18th December 2018 ;

And whereas, it is also specified in the said notification that any objection or suggestion which may be received by the Additional Chief Secretary to the Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the Government with respect to the said draft ;

And whereas, the Government considers it expedient to extend the said date till 1st January 2019.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sections 29-A and 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (1 of 1904), the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows :—

In the said notification for the figures, letters and word “18th December 2018”, the figures, letters and word “1st January 2019” shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.